दै. पुढारी दि. 10-05-24



नांदेड : इतवारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित भोईटे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक संग्राम जाधव आणि त्यांच्या टीमने एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून एक गावठी पिस्तल एक जिवंत काडतूस, तीन तलवारी आणि एक खंजीर असा शस्त्रसाठा जप्त करून त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे.

दै. लोकमत दि. 10-05-24

# गावठी पिस्टल अन् जिवंत काडतुसांसह एक जण जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : दोन दिवसांपूर्वीच अष्टविनायकनगर भागातील गोळीबार प्रकरणी पोलिसांनी दोघांना जेरबंद केले होते. त्यानंतर मंगळवारी मामा चौकातून एका आरोपीस तीन जिवंत काडतुसे आणि गावठी पिस्टलसह ताब्यात घेतले. ह्या दोन्ही घटना ताज्या असतानाच इतवारा पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने बुधवारी मध्यरात्री एका तरुणास गावठी पिस्तूल आणि जिवंत काडतुसासह पकडले.

शहरातील इतवारा पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक संग्राम जाधव आणि त्यांचे सहकारी इतवारा हद्दीत बुधवारी रात्री गस्तीवर असताना इस्लामपुरा भागात हे एक जण पिस्टल घेऊन फिरत असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन शेख इस्माईल शेख संदलजी (वय २४, रा. इस्लामपुरा) यास



ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्या ताब्यात एक गावठी पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस मिळाले. तसेच त्याच्या घरातून तीन तलवारी, दोन खंजर असा शस्त्रसाठा जप्त केला. आरोपीविरुद्ध इतवारा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून सहायक पोलिस निरीक्षक राजू चव्हाण हे तपास करीत आहेत. कार्यवाहीबद्दल पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलिस उप अधीक्षक सुशीलकुमार नायक आदींनी पथकाचे कौतुक केले.